महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : eooandm@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३०९ दिनांक २१ / ०८ / २०१०

विषय : म.रा.वि.वितरण कंपनीतील अधिकाऱ्यांना परदेश दौऱ्यावर पाठविण्याबाबत.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यप्रणालीमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करता यावा म्हणून वितरण कंपनीतील अधिकारी/कर्मचारी यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित विविध विषयावरील चर्चासत्र/परिषदा/ प्रशिक्षण यामध्ये सहभागी होण्यासाठी विदेशात पाठविणे आवश्यक असते. सदर बाबीस शासनाची सहमती आवश्यक आहे. बरेचदा व्यवस्थापनाची सहमती असूनही शासनाची मंजुरी वेळेमध्ये प्राप्त न झाल्यामुळे कंपनीचा मुळ उद्देश सफल होत नाही. त्यामुळे कंपनीच्या अधिकारी/कर्मचारी यांना भारताबाहेर विविध चर्चासत्र/परिषदा/प्रशिक्षण यामध्ये सहभागी होता यावे यासाठी परदेश दौऱ्यावर पाठविण्यासाठी शासनाची पूर्व संमती घेण्याची अट शिथील करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी कार्यकारी संचालक (मासं), संचालक (प्रकल्प) व संचालक (संचलन) यांचेसोबत विचारविनिमय करून वितरण कंपनीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना विदेश दौऱ्यावर पाठविणे संबंधीच्या प्रस्तावास खाली दर्शविल्याप्रमाणे पुर्व संमती घेण्याबाबत मंजुरी प्रदान केली आहे.

अ) व्यवस्थापकीय संचालक यांचा विदेश दौऱ्याबाबतचा प्रस्ताव पूर्व संमतीसाठी प्रचलित नियमांप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात यावा.

ब) कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या मुख्य अभियंता, कार्यकारी संचालक आणि संचालक यांच्या विदेश दौऱ्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पूर्व संमतीसाठी न पाठविता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीकडे अध्यक्ष यांच्या संमतीसाठी सादर करण्यात यावेत.

क) इतर सर्व अधिकारी/कर्मचारीवर्ग, अभियंते यांच्या विदेश दौऱ्यांच्या प्रकरणांचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पूर्व परवानगीसाठी न पाठविता संबंधीत संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांच्यामार्फत व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांच्या मंजूरीकरिता सादर करण्यात यावेत.

३. परदेश दौऱ्यावर पाठविण्यासंबंधीचे इतर निकष व शर्ती अबाधित राहतील.

४. उपरोक्त निर्देश हे प्रशासकीय परिपत्रक जारी झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि.वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(सु. य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालय स्तरापर्यंत.

*D:\O&M\Adm.Cir - F.N.348-Foreign Tour.doc*
*21/8/10*